Form -1-A

# FIRST INFORMATION REPORT MR/ № 193357

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P. C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

1. State/राज्य ........ Dist./जिल्हा ........ P. S./पोलीस ठाणे ........ FIR/Proceeding/Reg. No./पहिली खबर क्रमांक ........ Date/तारीख २८/१२/२०१८

2. (i) Act/अधिनियम : ........ Sections/कलमे ........
   (ii) Act/अधिनियम : ........ Sections/कलमे ........
   (iii) Act/अधिनियम : ........ Sections/कलमे ........
   (vi) Other Acts & Sections/इतर अधिनियम व कलमे ४१(१)

3. (a) Ocurrence of Crime : Day/अपराधाची घटना वार ........ Date From/तारखेपासून ........ Date To/तारीख पर्यंत ........
   Time Period/वेळेचा अवधी ........ Time From/पासून ........ Time To/पर्यंत ........
   (b) Information received at P. S./पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख Date ........ Time/वेळ ........
   (c) OccurenceReg./General Station Diary Reference Entry No./गुन्हा दाखल झाल्याची सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. ........ Date/तारीख ........ Time/वेळ ........

4. Type of Information Written / Oral : ........
   माहितीचा प्रकार लेखी / तोंडी

5. Place of Occurrence :
   घटनेचे ठिकाणी
   (a) Direction and Distance From P. S. : ........ Beat No./Chauki No. ........
   पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर
   (b) Address : ........
   पत्ता
   (c) In case outside limit of this Police Station, ~~then the~~
   या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नाव
   Name of P. S. ........ Dist. ........
   पोलीस ठाणे

6. Complainant / Informant : सरकार तर्फे ... पोलीस निरीक्षक ... पोलीस ठाणे ... जळगाव
   तक्रारदार / खबरी
   (a) Name : ........
   नांव
   (b) Father's Husband's Name : ........
   पित्याचे / पतीचे नाव
   (c) Date / Year of Birth : ........ (d) Nationally : ........
   जन्म तारीख / वर्ष राष्ट्रीयत्व
   (e) Passport No. : ........ Date of Issue : ........ Place of Issue ........
   पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण
   (f) Occupation : ... जळगाव
   व्यवसाय
   (g) Address : ........
   पत्ता

7. Details of known / suspected with full Address (Attach separate sheet if necessary)
   माहित असलेल्या / संशयित आरोपीचा संपूर्ण पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) ... ३४ ... रा. ... जळगाव

8. Reasons for delay in reporting by the Complainant / Informant :
तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

9. Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :
..............................................................................................................................

10. *Total value of properties stolen / involved : ..............................................................
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report / U.D./A. D Case No., if any : ..............................................................
मरणोन्वेषण अहवाल/अ. मृत्यु प्रकरण क्र. जर असल्यास :

१) गुन्हयाची थोडक्यात हकीगत :— तक्रारदार हे अमळगांव ता.अमळनेर जि.जळगांव येथील रहिवासी असुन तक्रारदार यांना परदेशात शिक्षणाकामी जावयाचे असल्याकारणाने तक्रारदार यांनी प्रादेशीक पासपोर्ट कार्यालय, लोअर परेड ,मुंबई, कार्यालयात ऑन लाईन अर्ज भरला होता.त्याबाबत पासपोर्ट कार्यालयाकडुन तक्रारदार यांना फाईल कमांक BO-3062749677618 असा देण्यात आला होता. सदर प्रकरण पडताळणी करण्यासाठी मारवड पोलीस स्टेशन येथे आले असले बाबत दि.०२.०९.२०१८ रोजी मारवड पोलीस स्टेशन येथील गोपनिय विभागातील श्री.संजय रमेश बोरसे, पोलीस नाईक यांनी तक्रारदार यांना कळवुन तक्रारदार यांना भेटण्यास बोलविले होते. तेव्हा तक्रारदार हे श्री.संजय रमेश बोरसे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे पासपोर्ट प्रकरण पडताळणी करुन अनुकुल अहवाल पाठविण्यासाठी ५००/— रु लाचेची मागणी केल्याबाबत तक्रारदार यांनी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कडेस तकार दिली होती.

दि.०५.०९.२०१८ रोजी सदर तकारीची पडताळणी करुन अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने मारवड पोलीस स्टेशनच्या परिसरात सापळा लावला असता श्री.संजय रमेश बोरसे, पोलीस नाईक, मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि.जळगांव यांनी तकारदार यांचे पासपोर्ट प्रकरण पडताळणी करुन अनुकुल अहवाल पाठविण्यासाठी तकारदार यांच्याकडे दिं.०५.०९.२०१८ रोजी लाच पडताळणी पंचनाम्या दरम्यान ५००/— रू. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दि.०५.०९.२०१८ रोजी झालेल्या सापळा स्थगिती पंचनाम्यावरून श्री.संजय रमेश बोरसे, पोलीस नाईक, यांनी लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केल्याने त्यांचे विरूध्द मारवड पो.स्टे. गुरनं.३००६/२०१८ लाच लुचपत प्रतिबंधक (सुधारीत) कायदा सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचे प्रथम खबरी अधिकारात असणारे मॅजि.सो यांच्याकडे रवाना करुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री.एन.एस.लोधी, अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव यांच्याकडे देण्यात आला आहे.

........................ as mentioned at Item No. 2...

1) registered the case and took up the investigation or
2) directed (Name of I.O.) : एन. एस. लोधी पोलीस निरीक्षक अँटी करप्शन ब्युरो जळगाव
................................... Rank .......................................... to take up the investigation or
3) Refused investigation due to......................................................................................
4) transferred to P.S. ............................Dist ............................ State.................on point of jurisdiction

केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याने वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले .............................. पदनाम .............. तपासाचे काम हाती घेतले.

(For Cross Entries)

पो. स्टे. च्या इतर रजिस्टरच्या क्रॉस नोंदी करीता

(a) Charge Seat / Final No. : ..............................(b) Court Case No. :...............................................
दोषारोप क्रमांक/फायनल नंबर : कोर्टाचा केस नंबर :

(c) Result of Court in short : ..............................................................................................
कोर्टाचा थोडक्यात निकाल :

(d) V.C.R./Chowki Reg No. : ..............................(e) G. C. R. No. :.................... (f) K.C.R No...................
व्हिलेज क्राईम नोट बुक/ चौकी रजि.नं : सर्वसाधारण गुन्हा नं : माहितगार गुन्हेगाराचे रजि. नं.

F/ I. R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to Complainant / Informant free of cost.

पहिली खबर तक्रारदाराला / खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दि...
(R.O.A.C.)

14. Signature and Thumb impression of the Complainant/Informant,
तक्रारदाराची सही व अंगठा

Signature of the Officer in charge of Police Station
पोस्टे प्रभारी अधिकाऱ्याची सही

Name : ...........................
नाव

Rank : ...........................
हुद्दा

फिर्याद

मारवड पोलीस स्टेशन
दि.२९.०९.२०१८.

मी निलेश सुरेश लोधी, पोलीस निरीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव.

सरकार तर्फे फिर्यादी होवून फिर्याद लिहुन देतो की, मी अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव येथे दि.१४.०८.२०१८ पासुन पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.०३.०९.२०१८ रोजी आम्ही कार्यालयात हजर असतांना मा. पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर यांनी आम्हास त्यांच्या कक्षात बोलवुन सांगितले की, तक्रारदार श्री.महेन्द्र रमेश पाटील, वय.३२, व्यवसाय शिक्षण रा.अमळगांव ता.अमळनेर जि. जळगांव यांनी आमच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधुन कळविले की, ते मारवड ता.अमळनेर जि.जळगांव येथील एका लोकसेवका विरुध्द लाचमागणीची तक्रार देणार असुन ते दि.०५.०९.२०१८ रोजी मारवड गावाचे २ ते ३ कि.मी अलीकडे अमळनेर – मारवड रस्त्यावर भेटणार आहेत. तेव्हा तुम्ही लाचेच्या सापळयाचे आयोजन करुन पुढील कार्यवाही करणे बाबत निर्देश दिल्याने आम्ही लाचेच्या सापळयाचे आयोजन निश्चित करुन दि.०३.०९.२०१८ रोजी दोन सरकारी पंच उपलब्ध करून घेवून दि.०५.०९.२०१८ रोजी मारवड येथे जावुन पुढील कार्यवाही करण्याचे निश्चित केले.

दि.०५.०९.२०१८ रोजी दोन्ही पंच हे आम्ही दिलेल्या सुचनेप्रमाणे अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात हजर झाले. आम्ही दोन्ही पंचाना पुढील सापळा कार्यवाही बाबत थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर शासकीय वाहन क्र.एम.एच.१९ एम. ०५९९ वरील चालक श्री.महेश सोमवंशी सह दोन्ही पंच, पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर, आम्ही व सापळा पथकातील कर्मचारी शासकीय वाहनाने अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातुन सापळा कार्यवाही करीता आवश्यक साहित्यासह रवाना होवुन धरणगांव, टाकरखेडा अमळनेर मार्गे मारवड गावाचे २ ते ३ कि.मी अलीकडे अमळनेर – मारवड रस्त्यावर तक्रारदार यांनी सांगितलेल्या ठिकाणी पोहचलो. तेव्हा तेथे एक इसम उभा होता. त्याने त्यांचे नांव श्री.महेन्द्र रमेश पाटील, रा.अमळगांव ता. अमळनेर जि.जळगांव असे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना शासकीय वाहनात बसवुन घेवुन तक्रारदार व दोन्ही पंचांची आपसांत ओळख करून दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार हे काय हकिगत कथन करतात ती दोन्ही पंचांस ऐकण्यास सांगितली. तेव्हा दोन्ही पंचांनी तक्रारदार यांनी कथन केलेली तक्रार ऐकली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांची तक्रार हस्ताक्षरात लिहुन घेतली, व सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही स्वत: व पंचांनी त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाचे व तक्रारदाराचे व्यक्तव्य रेकॉर्ड केले. तक्रारदार व पंच क्र.१ यांना थोडक्यात सुचना देवुन व तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देण्याबाबत पोकॉ.अरुण पाटील यांना सुचना दिल्याने पोकॉ.अरुण पाटील यांनी सदरचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन ते तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टाच्या आतील बंडीच्या खिशा मध्ये ठेवुन दिले. तक्रारदार व पंच क्रं.१ यांना पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांची भेट घेण्यासाठी मारवड पोलीस स्टेशन येथे तक्रारदार यांच्या मोटार सायकलीने रवाना केले. तेव्हा सापळा पथक व पंच क्रं २ शासकीय वाहना जवळ थांबुन होते.

त्यानंतर तक्रारदार व पंच क्रं. १ हे तक्रारदार यांच्या मोटार सायकलीने शासकीय वाहना जवळ परत आले. तेव्हा आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पोकॉ.अरुण पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे दिलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर पंच क्रं.१ यांना शासकीय वाहनापासुन रवाना केल्यानंतरची घडलेली हकीगत विचारली असता पंच क्र.१ यांनी पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांनी तक्रारदार यांच्याकडे ५००/– रुपये लाचेची मागणी केल्याबाबत सविस्तर हकीगत सांगितली. तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

दि.०५.०९.२०१८ रोजी करण्यात आलेला लाचमागणी पडताळणी पंचनाम्यावरुन पोलीस कर्मचारी श्री.बोरसे, मारवड पोलीस स्टेशन यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली आहे. तसेच तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेवुन मारवड पोलीस स्टेशन येथे बोलविले असल्याने आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम घेवुन पोलीस कर्मचारी श्री.बोरसे, यांची भेट घेण्यासाठी पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर तक्रारदार यांनी ५००/–रूपये लाचेची रक्कम हजर केल्याने तसा सविस्तर सापळापुर्व पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंच क्रं. १ यांना थोडक्यात सुचना दिल्या. आमच्या सुचनेवरुन पोकॉ.अरुण पाटील यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नविन सेल व नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन कोणाला दिसणार नाही अशा रितीने तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतील बंडीच्या खिश्या मध्ये ठेवुन दिले. तक्रारदार आणि पंच क्रं.१ यांना पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांना लाचेची रक्कम देण्याकरीता मारवड पोलीस स्टेशन येथे तक्रारदार यांच्याकडील मोटार सायकलीने रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ आम्ही पंच क्रं.२ व सापळा पथक असे शासकिय वाहनाने मारवड गावाचे २ ते ३ कि.मी अलीकडे अमळनेर – मारवड रस्त्यावरुन निघुन मारवड पोलीस स्टेशनकडे रवाना होवुन मारवड पोलीस स्टेशनच्या अलीकडे आडोशाला शासकिय वाहन उभे करून मारवड पोलीस स्टेशनच्या आजु बाजुस सापळा लावण्याचा निर्णय घेतला. सापळा पथकातील सदस्य मारवड पोलीस स्टेशनच्या आजु बाजुस सुरक्षित जागा घेवुन थांबले.

त्यानंतर तक्रारदार यांनी कुठल्याही प्रकारचा इशारा न करता पंच क्र. १ सह तक्रारदार यांच्या मोटार सायकलीने मारवड पोलीस स्टेशनच्या बाहेर येवुन शासकिय वाहनाजवळ जावुन थांबले. त्यानंतर आम्ही व पोलीस उप अधिक्षक श्री.जी.एम.ठाकुर, पंच क्र.२ व सापळा पथक असे शासकिय वाहनाजवळ आलो त्यावेळी शासकिय वाहनाजवळ तक्रारदार व पंच क्र १ हे थांबुन होते. त्यानंतर तक्रारदार यांच्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर आमच्या सुचनेवरुन पोकॉ.अरुण पाटील यांनी ताब्यात घेवुन ते बंद केले. त्यानंतर आम्ही पंच क्र.१ यांना शासकिय वाहनापासुन रवाना केल्या पासुनची घडलेली हकिगत विचारली असता पंच क्र.१ यांनी सांगितले की, " मी व तक्रारदार असे शासकीय वाहना पासुन रवाना होवुन मारवड पोलीस स्टेशन येथे गेलो. तेव्हा पोलीस कर्मचारी श्री.बोरसे हे मारवड पोलीस स्टेशनच्या गोपनिय कक्षात हजर होते. तेव्हा तक्रारदार यांनी पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांची भेट घेवुन त्यांच्या पासपोर्ट प्रकरणांचे कागदपत्रांचे पडताळणी कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना पैसे देवु केले असता, त्यांनी पैसे घेण्यास नकार देवुन त्यांना तेथुन रागात जाण्यास सांगितल्याची हकिगत कथन केली. तसा सविस्तर सापळा स्थगीती पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा कारवाई करीता हजर केलेल्या अ.पा.लावलेल्या ५००/– रुपये (१००/–रू.दराच्या ०५ नोटा ताब्यात घेवुन सदरच्या नोटा एका खाकी पाकीटात ठेवुन पाकीट सिलबंद करुन सदर पाकीटावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया करुन सदरचे सिलबंद पाकीट तपासकामी ताब्यात घेतले.

तक्रारदार यांना परदेशात शिक्षणाकामी जावयाचे असल्याकारणाने तक्रारदार यांनी प्रादेशीक पासपोर्ट कार्यालय, लोअर परेड ,मुंबई, कार्यालयात ऑन लाईन अर्ज भरला होता.त्याबाबत पासपोर्ट कार्यालयाकडुन तक्रारदार यांना फाईल क्रमांक BO-3062749677618 असा देण्यात आला होता. सदर प्रकरण पडताळणी करण्यासाठी मारवड पोलीस स्टेशन येथे आले असले बाबत दि.०२.०९.२०१८ रोजी मारवड पोलीस स्टेशन येथील गोपनिय विभागातील पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांनी तक्रारदार यांना कळवुन तकादार यांना भेटण्यास बोलविले होते. तेव्हा तक्रारदार हे पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांना भेटले असता पोलीस कर्मचारी श्री.बोरसे यांनी तक्रारदार यांचे पासपोर्ट प्रकरण पडताळणी करुन अनुकुल अहवाल पाठविण्यासाठी ५००/– रु लाचेची मागणी केल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती. तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन लाचमगाणी पडताळणी केली असता दि.०५.०९.२०१८ रोजी आलोसे श्री.बोरसे,पोलीस कर्मचारी यांनी पंच क्र.१ यांच्या समक्ष तक्रारदार यांच्याकडे ५००/–रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्याअनुषंगाने दि.०५.०९.२०१८ रोजी सापळा लावण्यात आला होता. सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.बोरसे पोलीस कर्मचारी यांनी तक्रारदार यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही.कारण तक्रारदार पैसे आणण्याच्या सबबीवर मारवड पोलीस ठाण्यातुन निघुन आले व १०/१५ मिनिटात परत मारवड पोलीस स्टेशनला गेले नाहीत.तक्रारदार यांना पैसे आणण्यात विलंब झाल्याने श्री.बोरसे यांच्या लक्षात आले व त्यावरुन श्री.बोरसे यांना लाचेच्या सापळयाबाबत संशय आला असावा.

त्याअनुषंगाने मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि, नशिक परिक्षेत्र नाशिक यांचेकडील जा.क्र. नापना/लाच मागणी कारवाई/जळगांव/२०१८/३९२२ दि. २५/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये लोकसेवक श्री.बोरसे,पोलीस कर्मचारी, मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि. जळगाव यांचे विरुध्द लाच लुचपत प्रतिबंधक (सुधारीत) कायदा सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करणे बाबत आदेश प्राप्त झाले आहेत.

एकंदरीत सापळा कारवाई वरुन असे निष्पन्न झाले आहे की, दि.०५.०९.२०१८ रोजी लाचमागणी पडताळणी पंचनाम्या दरम्यान श्री.संजय रमेश बोरसे वय.४२, पोलीस नाईक, ब.नं.१६६६, नेमणुक, मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि.जळगांव यांनी पंच क्र.०१ यांच्या समक्ष तक्रारदार श्री.महेन्द्र रमेश पाटील यांच्याकडे त्यांचे पासपोर्ट प्रकरण पडताळणी करुन अनुकुल अहवाल पाठविण्यासाठी ५००/– रूपये लाचेची मागणी केली. तसेच दि.०५.०९.२०१८, रोजी झालेल्या सापळा स्थगिती पंचनाम्यावरून श्री.संजय रमेश बोरसे वय.४२, पोलीस नाईक, ब.नं.१६६६, नेमणुक, मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि. जळगांव यांनी लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा प्रकारे श्री.संजय रमेश बोरसे वय.४२, पोलीस नाईक, ब.नं.१६६६, नेमणुक, मारवड पोलीस स्टेशन ता.अमळनेर जि.जळगांव (खाते पोलीस विभाग वर्ग ३) यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरमार्गाने दुरूपयोग करून तक्रारदार श्री.महेन्द्र रमेश पाटील यांचेकडे पंच साक्षीदारांसमक्ष दि.०५.०९.२०१८ रोजी ५००/–रु. लाचेची मागणी करून लाचेची रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केल्याने त्यांनी त्यांचे लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वत:साठी पैशांच्या स्वरूपात लाभ मिळविण्याची व्यवस्था करून गुन्हेगारी स्वरूपाचे गैरवर्तन केले. म्हणुन त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक (सुधारीत)कायदा सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा केला आहे म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

हे लिहुन दिले सही
दि.२९.०९.२०१८

पोलीस ठाणे अंमलदार
मारवड पोलीस स्टेशन